*मुद्रा यशोगाथा*
*नाव :- श्रीमती संजीवनी जाधव, जि.जालना*
*व्यवसाय :- आवळा प्रक्रिया उद्योजिका*

## *पंतप्रधान मुद्रा बँक योजनेच्या माध्यमातुन साधला स्वयंरोजगार*

*आयुर्वेद तसेच दैनंदिन जीवनामध्ये आवळा या फळाचे असंख्य उपयोग आहेत. पहिली चव घेताच अतिशय तुरट लागणारा आवळा काही क्षणात जिभेवर अगदी अमृताचा गोडवा आणतो. पंतप्रधान मुद्रा बँक योजनेच्या माध्यमातुन कर्ज घेऊन आवळयाच्या व्यवसायातून संजीवनी जाधव यांच्या जीवनातसुद्धा अमुलाग्र बदल झाला आहे. केवळ ९ वीपर्यंत शिक्षण घेतलेल्या असणाऱ्या संजीवनी जाधव यांनी आवळा उद्योगाच्या माध्यमातून एक यशस्वी उद्योजिका होऊन समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.*

*लहान वयातच संजीवनी जाधव यांचे लग्न अशोक जाधव यांच्यासोबत झाले. सासरची परिस्थिती हालाकीची होती. अशोक जाधव हेसुद्धा कामगार म्हणून काम करत असल्याने हालाकीच्या परिस्थितीमध्ये जीवन जगावे लागत होते. संजीवनी जाधव यांच्या अंगी जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी होती. त्यातच त्यांना बचतगटाची संकल्पना सुचली. शेजारी आठ ते दहा महिलांनी त्यांनी एकत्रित करुन बचतगटाची सुरुवात केली. जालना तालुक्यात असलेल्या खरपुडी येथील कृषि विज्ञान केंद्रामध्ये आवळयावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाचे पाच दिवसांचे प्रशिक्षण घेऊन त्यांनी व्यवसाय सुरु केला आणि त्यांच्या यशस्वी उद्योजिकेच्या प्रवासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. तयार केलेल्या मालाला बाजारपेठेतुन मोठ्या प्रमाणात मागणी येऊ लागली. वाढत्या मागणीप्रमाणे माल तयार करुन देण्यासाठी कच्च्या मालाची आवश्यकता होती व त्यासाठी पैशांची चणचण भासु लागली. पण पंतप्रधान मुद्रा बॅक योजनेच्या माध्यमातुन कर्ज घेऊन उद्योगासह कुटूंबाच्या भरभराटीला सुरुवात झाली.*

*मागणीप्रमाणे बाजारपेठेमध्ये माल तयार करुन देण्यासाठी कच्चा माल विकत घेण्यासाठी व प्रक्रिया करण्यासाठी पंतप्रधान मुद्रा बँक योजनेने साथ दिली. केंद्र शासनाने बेरोजगार व उद्योग करु इच्छिणाऱ्यांसाठी विनातारण कर्ज देणारी योजना सुरु केल्याचे कळाले. जालना येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत पंतप्रधान मुद्रा बँक योजनेच्या कर्जाविषयी चौकशी केली असता बँकेचे व्यवस्थापक श्री कुतवळ यांनी या महिलेची धडपड व जिद्द व व्यवसाय करण्याची चिकाटी पाहुन ४ लाख रुपयांचे कर्ज मंजुर केले आणि या पैशांच्या माध्यमातुन १० हजार रुपयांपासुन सुरु केलेला व्यवसायाची वार्षिक उलाढाल २० ते २५ लाख रुपयांपर्यंत गेली आहे. या उद्योगाच्या माध्यमातुन मिळालेल्या पैशामधुन माझ्या दोन मुलींना उच्च शिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभा करता आले आहे. आज माझ्या दोनही मुली अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहेत. जर मुद्रा बँक योजनेने आधार दिला नसता तर कदाचित मुलींना शिक्षण देता आले नसते. मुद्रा बँक योजनेच्या कर्जामुळेच मी माझ्या कुटूंबाचा आर्थिक स्तर उंचावुन समाजामध्ये सन्मानाने जगत आहे.*

*उद्योग, व्यवसाय करण्यासाठी शिक्षणच हवे असे नाही. अंगी जिद्द, मेहनत आणि काहीतरी करुन दाखविण्याची जिद्द असेल तर कुठल्याही क्षेत्रात आपण यशस्वी होऊ शकतो. तरुण, तरुणींनी नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय उभा करावा. तसेच महिलांनीही आता पुढे येऊन विविध व्यवसाय करण्याची गरज आहे, असा संजीवनी यांचा आग्रह आहे. उद्योगाच्या माध्यमातून आपला आर्थिक स्तर उंचावण्याबरोबरच बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचे काम या माध्यमातून करावे,असा त्यांचा दृष्टीकोन आहे.*

---------------







# मुद्रा बँक योजनेच्या माध्यमातून भगवान जाधव यांनी साधला स्वयंरोजगार

जालना तालुक्यातील राणी उंचेगाव येथील बेरोजगार तरुण भगवान जाधव यांनी नोकरी लागत नसल्याने हताश झाले होते. परंतू त्यांना पंतप्रधान मुद्रा बँक योजनेबद्दल माहिती मिळावी व महाराष्ट्र बँकेच्या माध्यमातुन कर्ज घेत गावातच पानशॉप सुरु केले. अल्पावधीतच त्यांचा हा व्यवसाय भरभराटीस आला व पंतप्रधान मुद्रा बँक योजनेच्या माध्यमातुन जगण्यास एक नवी उमेद मिळाल्याची भावना श्री जाधव यांनी व्यक्त केली.



## पंतप्रधान मुद्रा बँक योजनेची कमाल

### किराणा दुकानाच्या माध्यमातुन मिळाला स्वयंरोजगार

विनातारण कर्ज उपलब्ध करुन देणाऱ्या पंतप्रधान मुद्रा बँक योजनेच्या माध्यमातुन राणी उंचेगाव येथील तरुण राजेश बाबासाहेब शिंदे यांनी किराणा दुकानाच्या माध्यमातुन रोजगार मिळवत गावातील तरुणांपुढे एक आदर्श निर्माण केला आहे. तरुणांमध्ये काहीतरी करण्याची धडपड आहे, जिद्द आहे परंतू केवळ भांडवलापोटी उद्योग व्यवसाय करता येत नव्हता. परंतू पंतप्रधान मुद्रा बँक योजनेच्या माध्यमातुन विनातारण कर्ज उपलब्ध झाले व व्यवसायही थाटता आला आहे. तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता पंतप्रधान मुद्रा बँक योजनेच्या माध्यमातून कर्ज घेऊन स्वत:चा व्यवसाय थाटावा असे आवाहन करत येणाऱ्या काळात याच योजनेच्या माध्यमातुन मोठा व्यवसायही उभारण्याचा मानस असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

